**निशाण १४ लगत**

**मोटार अपघात अर्ज क्र. १/२०१८** (सर्वेश राघोबा गांवकर —अर्जदार विरुध्द महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ वगैरे —सामनेवाले) सर्वेश राघोबा गांवकर, वय २५ वर्षे, धंदा — शिक्षण, रा. कणकवली, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग शपथेवर कथन करतो की, मी दिलेल्या सरतपासाचे शपथपत्रातील मजकूर मला वकीलांनी वाचून दाखविला होता, तो माझे माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे.

१. मी माझे अर्जासोबत अभिलेखावर यादी नि. ५ सोबत दस्तऐवज दाखल केलेले आहेत. सामनेवाला क्र. २ चा वाहन चालविण्याचा परवाना नि. ४५, विमा पॉलिसी नि. ४६, माझे मोटार वाहनाचा परवाना नि. ४७. माझे विनंतीप्रमाणे अर्ज मंजूर व्हावा.

**उलटतपास सामनेवाले क्र. १ व २ तर्फे विधिज्ञ श्रीमती एस्.आर.मसुरकर यांचा**

२. माझे इनोव्हा गाडीचा विमा न्यू इंडीया इंशुरन्स कंपनीकडे काढला होता आणि त्या कंपनीला मी सदरील अर्जामध्ये पक्षकार केलेले नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, मी माझे गाडीचा थर्ड पार्टी इंशुरन्स काढलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, ज्या ठिकाणी अपघात घडला, तो रस्ता अरुंद होता. हे म्हणणे खरे नाही की, घटनेदिवशी पाऊस पडला होता आणि रस्ता ओलसर झाला होता. सदरील एस.टी. मध्ये ३० ते ३५ प्रवासी होते किंवा नाही, हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, अपघात माझे चुकीमुळे घडला. हे म्हणणे खरे नाही की, नुकसानभरपाईची मी केलेली मागणी अवाजवी व भरमसाट आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरील अपघातामध्ये सामनेवाला क्र. २ याची चूक नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्ष खोटी दिली.

फेरतपास नाकारला.

श्रवणोत्तर स्विकृती.

सही/—

दिनांक :—०४/०१/२०१९

(एस्. डी. जगमलानी)
अध्यक्ष,
मोटार अपघात वाद न्यायाधीकरण,
सिंधुदुर्ग—ओरोस.